# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.05.2025** **वार:गुरुवार**

1. देशभरात तिरंगा यात्रेला सुरुवात
2. न्यायमूर्ती भूषण गवई भारताचे सरन्यायाधीश
3. पुरंदर किल्ल्यावरील छत्रपती संभाजी महाराजांच्या जन्मस्थळाचं संवर्धन करण्याची सरकारची ग्वाही आणि
4. खेलो इंडियामधे 141 पदकांसह महाराष्ट्र अव्वल स्थानावर

**राष्ट्रपती**

दहशतवादाचा बिमोड करण्यात सैन्यदलांनी दाखवलेल्या शौर्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कौतुक केलं आहे. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, वायु दल प्रमुख एअरचीफ मार्शल ए.पी. सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. त्यावेळी राष्ट्रपतींनी संरक्षण दलांच्या समर्पण आणि शौर्याचं कौतुक केलं.

**तिरंगा यात्रा-ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भारतीय जनता पक्षानं देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. 23 मेपर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार आहे.

ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरच्या लष्करी कारवाईमुळे पाकिस्तानसह जगाला भारतीय संरक्षण दलाची अभेद्य ताकद कळली, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. मुंबईत काढलेल्या तिरंगा यात्रेनंतर ऑगस्ट क्रांती मैदानात आयोजित सभेत मुख्यमंत्री बोलत होते. ते म्हणाले.....

**ऑपरेशन सिंदूरमध्ये अतिशय अचूक पद्धतीनं आतंकवाद्याचे नऊ अड्डे हे पाकिस्तानमध्ये घुसून त्या ठिकाणी उध्वस्त करून टाकले या नऊ हल्ल्यांचं सगळ्यात मोठं महत्व काय आहे. तर पाकिस्तानच्या आतमध्ये ज्या ठिकाणी पंजाब संतामध्ये शेवटच्या टोकाला जिथे त्यांना वाटायचं तिथे कधीच भारतीय सेना पोहचू शकत नाही म्हणून सगळ्या आतंकवाद्यांना ज्या ठिकाणी परिवारासहित राहायला जागा दिली होती नेमकं तिथे जाऊन भारतीय सेनेने ठोकलं आणि ते सगळे अड्डे उद्ध्वस्त केले.**

**सरन्यायाधीश-परिचय**

भारताचे 52 वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. 24 मे 2019 रोजी ते सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून रुजू झाले. या कार्यकाळात, न्यायमूर्ति गवई यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**छत्रपती संभाजी महाराज जयंती**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त काल त्यांना राज्यभरात अभिवादन करण्यात आलं. पुरंदर किल्ल्यावरील छत्रपती संभाजी महाराजांच्या जन्मस्थळाचं संवर्धन आणि पुनर्बांधणीसाठी लष्कराशी चर्चा करून प्रयत्न करण्याची ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिली. किल्ले पुरंदर इथं शेलार आणि मराठी भाषा आणि उद्योगमंत्री

उदय सामंत यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. त्यानंतर ते बोलत होते. रत्नागिरी जिल्ह्यातील कसबा या गावात संभाजी महाराजांचं स्मारक उभारण्यात येईल, अशी घोषणा सामंत यांनी यावेळी केली. सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीनं सासवडमध्ये आयोजित जयतु शंभू या सांस्कृतिक कार्यक्रमाचं उद्घाटनही शेलार यांच्या हस्ते झाले. यावेळी ढोल पथक, मर्दानी खेळ, वासुदेव, गोंधळी अशा शंभरहून अधिक लोक कलाकारांनी आपली कला सादर केली.

**राज्यपाल-कोकण कृषी विद्यापीठ**

कोकण कृषि विद्यापीठानं कृषी क्षेत्रातल्या बदलत्या आव्हानांना तोंड देण्याची क्षमता सातत्यानं दाखवून दिली आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले. दापोली इथल्या डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा त्रेचाळिसावा पदवीदान समारंभ काल राज्यपालांच्या उपस्थितीत पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर संजय भावे, आदी मान्यवर उपस्थित होते.

**मुख्यमंत्री-मुंबई मेट्रो**

मुंबई मेट्रोच्या कामापैकी 50 किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर 62 किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिलं. दहिसर ते काशीगाव या मेट्रोच्या टप्प्याची तांत्रिक तपासणी झाल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**सामंजस्य करार**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातली आयबीएम कंपनी आणि यशस्वी स्किल्स लिमिटेड यांच्यात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम अंमलबजावणीसाठी नुकताच सामंजस्य करार झाला. या करारामुळे मुक्त विद्यापीठाच्या लाखो विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच रोजगाराभिमुख संगणकीय कौशल्य आधारित शिक्षण मिळणार आहे अशा माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी दिली...

**या करारानुसार विद्यापीठातील जे बीए बीकॉम आणि जे नॉन टेक्निकल कोर्सेस आहेत, या अभ्यासक्रमांची रोजगार क्षमता वाढीसाठी खरंतर हा सामंजस्य करार झालेला आहे. या सामंजस्य करारामधून आयबीएम सर्टिफिकेशन बीए बीकॉमच्या विविध विषयातील विद्यार्थ्यांसाठी अंडर ग्रॅज्युएट आणि पोस्ट ग्रॅज्युएट करणाऱ्यांसाठी हा अभ्यासक्रम आहे उपलब्ध असेल, आणि यातून ते जी इमर्जिंग टेक्नॉलॉजी आहे. त्यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स आहे डाटा एनालिसिस आहे मशीन लर्निंग आहे. या सगळ्या अभ्यासक्रमातून त्यांच्या क्षमता विकसित केल्या जातील आणि संगणक ही ज्या इमर्जिंग टेक्नॉलॉजी ते ग्रॅज्युएट होतील आणि ते रोजगारक्षम होतील हा मुख्य हेतू आहे.**

**पीव्हीजी**

महाराष्ट्रातल्या गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी 116 वर्षांपूर्वी दादासाहेब केतकर यांनी पुणे विद्यार्थी गृह या नावाने एक छोटेसे रोपटे लावले. आज या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले असून लाखो विद्यार्थ्यांची आयुष्य घडवण्यात पीव्हीजीचा मोलाचा वाटा आहे ऐकूया याविषयीचा अधिक वृत्तांत.....

**शतकाचा टप्पा पार केलेल्या पुण्यातल्या अगदी मोजक्याच शिक्षण संस्थांपैकी पुणे विद्यार्थी गृह ही एक संस्था. ज्ञानार्जनाचे कार्य अव्याहतपणे सुरू असून पुण्याप्रमाणेच नाशिकचे विद्यार्थी गृह देखील शतकाचा टप्पा पार केला आहे. प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, यासह अभियांत्रिकी व्यवस्थापन, परकीय भाषा केंद्र, तंत्र कौशल्य अशा विविध शाखांचा विस्तार होत आहे. संस्थेच्या वतीने लवकरच मुलींसाठी वस्तीगृह बांधण्यात येणार आहे तसेच येत्या शैक्षणिक वर्षापासून आणखीन एक इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू होणार आहे संस्थेच्या राज्यभरात जवळपास 17 शाळा असून यापैकी नाशिक मधील आदिवासी पट्ट्यातही शाळा बांधण्यात आली आहे. सद्यस्थितीत तब्बल 25 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मोफत निवास आणि शिक्षणाची व्यवस्था करणारी ही संस्था गरजू विद्यार्थ्यांसाठी एक दीपस्तंभ ठरत आहे. संस्थेची ही ज्ञानयात्रा अशी सव्याहत चालू राहील यात शंका नाही. आकाशवाणी बातम्यांसाठी सीमा चोरडिया, पुणे.**

**कुटुंब दिन**

15 मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन म्हणून ओळखला जातो. बदलत्या जीवन शैलीत आपले प्राधान्यक्रम बदलले आहेत. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात कुटुंब व्यवस्था काहीशी बळकट असल्याचं दिसून येतं. बदलत्या नागरीकरणाचा परिणाम नात्यांवरही होताना दिसत आहे. कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी गेली 30 वर्ष या क्षेत्रात काम करणाऱ्या पुणे जिल्हा न्यायालयाच्या वरिष्ठ कौटुंबिक समुपदेशक डॉक्टर स्मिता जोशी याविषयी आकाशवाणीशी बोलताना म्हणाल्या....

**मुलांना हल्ली नाती माहिती नाहीयेत आपली चुलती कोण आहे आपले मामा कोण आहेत मावशी कोण आहेत आते भाऊ कोण मावस भाऊ कोण ही जी सगळी नाती आहेत ही सुद्धा मुलांना माहिती होण गरजेच आहे की नात्याला सर्व्हिसिंग पाहिजे तर काही काही गोष्टीतन एकत्र यायला पाहिजे एकमेकांशी. बोलल पाहिजे संवाद वाढले पाहिजेत फक्त एकमेकांना गिफ्ट देण आणि विश करण व्हॉट्सएप वर मोबाईल वर या सगळ्या गोष्टींमध्ये जरी काही म्हणजे गोष्टी तुम्ही वेळ नाही म्हणून करताय पण तरीही वेळ काढण एकमेकांशी संवाद साधण या गोष्टी खूप महत्वाच्या आहेत.**

**पीएचडी**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या देदीप्यमान कार्यक्रम निर्मितीचा अभ्यास करुन ज्येष्ठ पत्रकार, लेखिका आणि वृत्तनिवेदक स्वाती महाळंक यांनी सादर केलेल्या प्रबंधाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे नुकतीच पीएच. डी. पदवी जाहीर करण्यात आली. "आकाशवाणी पुणे केंद्राची कार्यप्रणाली आणि मराठी साहित्य प्रसारातील योगदान" असा त्यांचा संशोधनाचा विषय होता. प्राध्यापक डॉक्टर माधवी खरात आणि प्राध्यापक डॉक्टर संस्कृती आवलगावकर यांनी त्यांना मार्गदर्शन केलं.

**खेलो इंडिया**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं 54 सुवर्ण, 43 रौप्य, 44 कास्य अशा 141 पदकांसह अव्वल स्थान कायम राखलं. महाराष्ट्रानं काल ॲथलेटिक्स स्पर्धेत दहा सुवर्ण पदकांसह 15 पदकं मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली. हर्षल जोगे, भूमिका नेहासे आणि अंचल पाटीलनं सुवर्णपदकं जिंकून ॲथलेटिक्सचं मैदान गाजविलं. कुस्तीमध्ये ऋतुजा गुरव हिनं सुवर्ण कामगिरी केली. टेनिसमध्ये मुलींच्या दुहेरीत ऐश्वर्या जाधव-आकृती सोनकुसारे या जोडीला सुवर्णपदक मिळालं. जिम्नॅस्टिकमध्ये मुंबईच्या अनुष्का पाटील हिनं सुवर्ण आणि रौप्य पदक पटकावलं. तर सायकलिंगमध्ये पुण्यात सराव करणारी मुंबईची आभा सोमणनं सुवर्णपदकाला गवसणी घातली.

**अकोला पाऊस**

अकोला जिल्ह्यात काल मूर्तिजापूर आणि अकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे जमिनीच्या ओलाव्यात वाढ होण्याची शक्यता असली तरी काही ठिकाणी फळबागांना फटका बसला आहे. सांगली जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना मुसळधार पावसानं झोडपलं.

**हवामान**

विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार